# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, कार्यालय चंद्रपूर

क्रमांक:एमएजी/कार्या-8/टे-1/2019/566 दिनांक :- 31/12/2019

वाचा:- महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग कडील शासन निर्णय क्रमांक.ध्वनीप्र-2009/ प्र.क्र.12/08/ता.का.1/दिनांक 22/08/2017

//आदेश//

**ज्या अर्थी** केंद्र शासनाच्या दि.10/08/2017 रोजीच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारीत नियम, 2017 च्या नियम 5 उपनियम (3) व त्यासोबत दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टिपणीनुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादीच्या वापराबाबत श्रोतृगृहे, सभागृह, सामुहिक सभागृहे, आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्हयाच्या निकडीनुसार, वर्षामध्ये 15 दिवस निश्चित करुन सकाळी 6 वाजल्यापासुन ते रात्री 12 वाजेपर्यत सुट जाहिर करण्याकरीता, जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

आणि ज्या अर्थी शासन निर्णय दिनांक 22 ऑगस्ट, 2017 अन्वये सन 2020 करीता 15 दिवस निश्चित करण्याकरीता, ध्वनी प्राधिकरण तथा पोलीस अधिक्षक, चंद्रपूर, यांचेशी दिनांक 31/12/2019 ला सल्लामसलत करण्यात आले व 10 दिवस निश्चित करण्यात आले असुन उर्वरीत 05 दिवस राखीव ठेवण्यात आले.

त्या अर्थी शासन निर्णय क्रमांक.ध्वनीप्र-2009/प्र.क्र.12/08/तां.का.1/दिनांक 22 ऑगस्ट, 2017 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, **मी, डॉ.कुणाल खेमनार, जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर,** ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, 2000 च्या नियम 5 (3) नुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी खालील प्रमाणे सन 2020 करीता 10 दिवसासाठी, फक्त ध्वनीची विहित मर्यादा राखुन सकाळी 6 वाजल्यापासुन ते रात्री 12 वाजेपर्यत परवानगी देण्याचे आदेश देता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | शिवजयंती | :- | 1 दिवस |
| 2. | ईद —ए-मिलाद | :- | 1 दिवस |
| 3. | डॉ.आंबेडकर जयंती | :- | 1 दिवस |
| 4. | गणेश उत्सव | :- | 3 दिवस (अनंत चर्तुदशी व 2दिवस ) |
| 5. | नवरात्री उत्सव | :- | 2 दिवस (अष्टमी व नवमी) |
| 6. | धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन | :- | 1 दिवस |
| 7. | 31डिसेंबर | :- | 1 दिवस |

वरील नमुद केल्याप्रमाणे ध्वनीक्षेपकाची/ध्वनीवर्धक वापरासाठी वेळेत सुट देणे बाबत **इतर 05 दिवसाचे** बाबतीत स्वतंत्र आदेश निर्गमीत करण्यात येईल त्याचप्रमाणे गणेश उत्सवाकरीता असलेले उर्वरीत 2 दिवसाचे बाबतीत सुध्दा स्वतंत्र आदेश निर्गमीत करण्यात येईल. तसेच उपरोक्त प्रमाणे सुट दिलेल्या दिवसाकरीता सक्षम प्राधिकारी कडून परवानगी घेवुनच त्यांनी ठरवून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणेच ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक चा वापर करता येईल.

(डॉ.कुणाल खेमनार)
जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर

प्रतिलीपी:-

1.मा.अपर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई -32 यांना माहितीस्तव सादर.

2.मा.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांना माहितीस्व सादर.

3.पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

4.उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व)------------------------------ यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

5.आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

6.तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, (सर्व)------------------------------- यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर यांना स्थानिक वर्तमान पत्रातून व्यापक प्रसिध्दी करण्याकरीता अग्रेषित.

8.मुख्याधिकारी, नगर पालीका/नगर पंचायत, --------------------------------- यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

9.जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, (एन.आय.सी.) जि.का. चंद्रपूर यांना सदर आदेशास chanda.nic.in वर प्रसिध्द करण्यात अग्रेषित.

जिल्हादडाधिकारी चंद्रपूर